# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.02.2025** **वारःशनिवार**

---

1. आर्थिक वर्ष 2024-25 च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार चालू आर्थिक वर्षातल्या जीडीपी मध्ये 6 टक्क्यांपेक्षा जास्त वाढ अपेक्षित;
2. 2047 पर्यंत भावी पिढ्यांना विकसित, मजबूत आणि समृद्ध भारत पाहता येईल-असा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा विश्वास
3. अर्थमंत्री निर्मला सीतारमण आज केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार
4. 19 वर्षांखालील महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत इंग्लंडचा पराभव करत भारत-अंतिम फेरीत आणि
5. भारत-इंग्लंड दरम्यान पुरुषांचा 20 षटकांचा अंतिम क्रिकेट सामना उद्या मुंबईत होणार

**<u>जीडीपी</u>**

देशाचा चालू आर्थिक वर्षातला जीडीपी म्हणजे सकल देशांतर्गत उत्पादन वृद्धीदर 6 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा अंदाज 2024-25 च्या आर्थिक पाहणी अहवालात वर्तवण्यात आला आहे. या सर्वेक्षणानुसार पुढील आर्थिक वर्षात ही वाढ 6 पूर्णांक 3 ते 6 पूर्णांक 8 दशांश टक्के राहण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी काल संसदेच्या दोन्ही सभागृहात 2024-25 चा आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर केला. देशांतर्गत अर्थव्यवस्थेचे मूलभूत घटक मजबूत असल्याचं या सर्वेक्षणात नमूद करण्यात आलं आहे. कृषी आणि सेवा क्षेत्रामुळे देशात स्थिर आर्थिक वाढ दिसून आली आहे. विक्रमी खरीप उत्पादन आणि अनुकूल कृषी परिस्थितीमुळे ग्रामीण क्षेत्रात सुधारणा दिसून येत असल्याचंही त्यात म्हटलं आहे.

मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन यांनी शेती हे भविष्याचं क्षेत्र असून शेतीमुळे जीडीपीमध्ये पाऊण टक्क्यांनी झालेली वाढ 1 टक्क्यापर्यंत जाण्यासाठी पुरेसा वाव असल्याचं म्हटलं आहे. सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्रही तिपटीनं वाढलं असल्याचं त्यांनी काल सांगितलं. नवीन विमानतळ, रेल्वे गाड्या आणि बंदरांवर पोहोचण्याचा कालावधी कमी करत पायाभूत सुविधांच्या बाबतीत देशानं चांगली कामगिरी केली आहे. दूरसंचार आणि वीज क्षेत्रातील क्षमतेतही वाढ झाली आहे असं ते म्हणाले.

**<u>पायाभूत सुविधा</u>**

देशाच्या औद्योगिक उत्पादनाच्या सुमारे 40 टक्के असलेलं भारतातील पायाभूत सुविधा उत्पादन, डिसेंबर 2024 मध्ये 4 टक्क्यांनी वाढलं आहे. ही वाढ आठपैकी सात प्रमुख क्षेत्रांमध्ये झालेल्या महिन्याभरातल्या वाढीमुळे झाली आहे. कोळसा, वीज, पोलाद, सिमेंट, रिफायनरी उत्पादने आणि खतांच्या उत्पादनात सकारात्मक वाढ नोंदवली गेली आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

देशातील भावी पिढ्या 2047 पर्यंत विकसित, मजबूत, सक्षम आणि समृद्ध भारत पाहतील असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला आहे. काल सकाळी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करताना त्या बोलत होत्या. जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारत आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थिरतेचा आधारस्तंभ म्हणून उदयास येत आहे, असं त्यांनी सांगितलं. सरकार देशाच्या विकासासाठी आणि लोककल्याण निश्चित करण्यासाठी सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तन या दृष्टिकोनासह अभूतपूर्व वेगानं काम करत आहे, असं त्या म्हणाल्या.

**अर्थसंकल्प**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज सकाळी 11 वाजता चालू आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर करतील. तर अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी राज्यसभेत अर्थसंकल्प मांडतील. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर, लोकसभेत आणि राज्यसभेत सोमवारी चर्चा होईल. वित्त विधेयक 2025, वक्फ सुधारणा विधेयक, बँकिंग कायदे सुधारणा विधेयक तसंच रेल्वे सुधारणा विधेयक यांसह 16 विधेयकं या अधिवेशनात चर्चा आणि मंजूरीसाठी घेतली जातील. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा 13 फेब्रुवारीपर्यंत चालेल तर अधिवेशनाचा दुसरा टप्पा 10 मार्च ते 4 एप्रिलपर्यंत चालेल. दरम्यान आज केंद्रीय अर्थसंकल्प सादर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, मुंबई शेयर बाजार आणि राष्ट्रीय शेयर बाजार व्यवहारांसाठी खुले राहणार आहेत.

**भारत-अमेरिका संबंध**

भारत आणि अमेरिके दरम्यानची व्यापक जागतिक धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्याच्या दृष्टीनं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लवकरात लवकर अमेरिका भेट घडवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं काल म्हटलं आहे. योग्य वेळी या भेटीच्या तारखा जाहीर करण्यात येतील असं मंत्रालायचे प्रवक्ते रणधीर जायस्वाल यांनी सांगितलं. इराणमधील बेपत्ता असलेल्या तीन भारतीयांच्या कुटुंबीयांशी आपण संपर्कात असल्याचं ते म्हणाले. हे तीन जण इराण ला व्यावसायिक संदर्भात गेले होते, मात्र इराण मध्ये पोहचल्याच्या थोड्याच अवधीनंतर त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नाही.

**मुंबई रेल्वे बॉम्ब**

जुलै 2006 मध्ये मुंबईत झालेल्या रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरणात 12 आरोपींना सुनावण्यात आलेल्या फाशीची आणि जन्मठेपेची शिक्षा कायम करण्याची मागणी करणाऱ्या महाराष्ट्र सरकारने दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णय काल मुंबई उच्च न्यायालयानं राखून ठेवला. 2015 मध्ये, कनिष्ठ न्यायालयानं 12 जणांना दोषी ठरवून त्यापैकी पाच जणांना फाशीची आणि 7 जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

**महाकुंभ-आयोग**

गेल्या बुधवारी महाकुंभ मेळयात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आयोगाच्या सदस्यांनी काल संगम घाटावर जाऊन पाहणी केली. या चेंगराचेंगरीत 30 जणांचा मृत्यू झाला तर, 60 जण जखमी झाले होते.

**दिल्ली-निवडणुक प्रचार**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचारासाठी आता शेवटचे चार दिवस उरले आहेत. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या पक्षाच्या प्रचाराची झोड उठवली आहे. मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी सर्व राजकीय पक्ष शर्थीचे प्रयत्न करत आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी काल द्वारका येथील प्रचार सभेत सहभागी झाले होते. राजधानी दिल्लीचा जलद गतीने विकास करण्यासाठी डबल इंजिन सरकारची आवश्यकता असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**फिलाडेल्फिया विमान अपघात**

अमेरिकेत, काल रात्री ईशान्य फिलाडेल्फियामध्ये एका लहान विमानाचा अपघात झाल्यानंतर अनेक जण जखमी झाल्याची भीती आहे. रॉनहर्स्टच्या निवासी परिसरातील गर्दी असलेल्या रुझवेल्ट मॉलजवळ हा अपघात झाला. या अपघातात मोठी आग लागली आणि त्यात किमान एक घर आणि अनेक गाड्या जळून खाक झाल्या. वॉशिंग्टनच्या रेगन राष्ट्रीय विमानतळाजवळ प्रवासी जेट आणि लष्करी हेलिकॉप्टर यांच्यातील टक्कर झाल्यानंतर दोनच दिवसांत ही घटना घडली आहे, ज्यामध्ये ज्यात 67 जणांचा मृत्यू झाला होता.

**तेंडुलकर**

विक्रमवीर सचिन तेंडुलकर याला BCCI चा सी के नायडू जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. पॉली उम्रीगर सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय खेळाडूचा पुरस्कार पुरुष गटात जसप्रीत बुमराला तर महिलांमधे स्मृती मानधना हिला जाहीर करण्यात आला आहे.

**आशियाई SPARDHA**

चीनमधील हार्बिन इथे 7 ते 14 फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या 9व्या आशियाई हिवाळी क्रीडा स्पर्धांमध्ये भारतीय पथकाच्या सहभागाला सरकारने मान्यता दिली आहे. पथकात 59 खेळाडू आणि 29 संघ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. आशियाई हिवाळी खेळांमध्ये देशाच्या सहभागासाठी सरकारने औपचारिकपणे आर्थिक सहाय्य देण्याची ही पहिलीच वेळ आहे असं क्रीडा मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

**राष्ट्रीय स्पर्धा**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या 38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र 32 पदकांसह चौथ्या स्थानावर आहे. यामध्ये 7 सुवर्ण, 16 रौप्य आणि 9 कास्य पदकांचा समावेश आहे. 10 मीटर एअर पिस्तुल स्पर्धेत पार्थ माने याने सुवर्ण पदक तर रुद्रांश पाटीलनं रौप्य पदक पटकावलं. सेना दलाच्या अंकुश जाधव याने या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं. खो-खो मध्ये महाराष्ट्राचा पुरुष संघ अंतिम फेरीत पोहोचला असून जलतरणामध्ये प्रतिक्षा डांगी, रिषभ दास, अवंतिका चव्हाण, मिहीर आंब्रे यांनीही चांगली कामगिरी करत पदकं मिळवली आहेत.

**क्रिकेट**

19 वर्षाखालील महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतानं अंतिम सामन्यात धडक मारली आहे. काल क्वालालंपूर इथं झालेल्या उपांत्य सामन्यात भारतानं, इंग्लंडवर 9 गडी राखून मात केली. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं 113 धावा केल्या. भारतानं हे लक्ष्य 15 षटकात केवळ एका खेळाडूच्या मोबदल्यात पार केलं. अंतिम सामन्यात आता भारताची लढत दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे.

तर भारत आणि इंग्लंड पुरुष क्रिकेट संघादरम्यान सुरू असलेल्या वीस षटकांच्या मालिकेत काल पुण्यात झालेल्या सामन्यात, भारतीय संघाने इंग्लंडचा 15 धावांनी पराभव करत मालिकेत 3-1 अशी विजयी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारताने 181 धावा केल्या. प्रारंभी भारतीय संघाची पडझड झाली, मात्र रिंकु सिंग आणि हार्दिक पांड्या यांनी अर्धशतकी खेळी करत डाव सावरला. प्रत्यूत्तरात इंग्लडला 166 धावाच करता आल्या. भारताकडून हर्षित राणा आणि रवी बिष्णोईने प्रत्येकी 3 बळी घेतले. शिवम दुबेला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. मालिकेतील शेवटचा सामना उद्या मुंबईत होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.